# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट ब (मुख्य) परीक्षा- २०१८ निकाल

## जाहिरात क्रमांक ३३/२०१८

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि.२६ ऑगस्ट, २०१८ व दि. २ सप्टेंबर, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१८ चा निकाल दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** उपरोक्त निकालानुसार शारीरिक चाचणीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठयर्थ शारीरिक चाचणी व मुलाखतीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शारीरिक चाचणीस बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता शारीरिक चाचणीचे / मुलाखतीचेवेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** प्रस्तुत निकालाआधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ व दि. ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या दि. २० मार्च, २०१८ रोजी किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल मुलाखतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य राहील.

**४.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**५.** प्रस्तुत पदासाठी शारीरिक चाचणी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या अर्जामध्ये नमूद असलेल्या मोबाईल क्रमांकावर वैयक्तिकरित्या एसएमएसव्दारे कळविण्यात येईल.

**६.** सदर लेखी परीक्षेच्या निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. त्या कार्यक्रमानुसार उमेदवारांनी शारिरीक चाचणीकरीता दिलेल्या तारखेस वेळेवर स्वखर्चाने उपस्थित रहावे. शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने कृपया याची नोंद घ्यावी व आवश्यकतेनुसार शारीरिक चाचणीसाठी सराव करावा. शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम १५ दिवसाच्या पूर्व सूचनेने कोणत्याही दिवशी जाहीर होऊ शकतो. शारीरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने ही बाब उमेदवारांना विदीत करण्यात येत आहे.

**७.** प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे ऑनलाइन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ कृपया पहावी.)

**उप सचिव (परीक्षा-१)**

**दिनांक - १८ मार्च, २०१९** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**